

## ७

# ।। संभावितपणाचे। वोझे जया ।।

**तरी कवणेही विषयींचे। साम्य होणे न रुचे।**
**संभावितपणाचे। वोझे जया।।१८५।।**

**– श्रीमद् गीता–ज्ञानेश्वरी अ. १३ वा**

तरी कोणत्याही विषयाचा अभिनिवेश पत्करून तद्रूप होणे ज्याला रुचत नाही त्याच्या सभ्यपणाचे कोणी वर्णन केल्यास त्यास ते ओझे वाटते.

सर्व भक्तश्रोत्यांना ह. भ. प. दिनकरचे सप्रेम नमस्कार. नव्या सहस्रकातील आणि नव्या शतकातील हे, आपल्या इटकरे गावचे पहिलेच श्रीमद्गीता – ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण. या पारायण सप्ताहातील पहिल्या दिवशीच्या प्रवचन सेवेची संधी मला लाभली हे माझे भाग्य!

तर भक्तहो, या श्रीमद् गीता ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायातील एकशे पंच्याऐंशी क्रमांकाची जी ओवी आपण प्रारंभीच ऐकलीत, तीच आजच्या आपल्या प्रवचन सेवेचा विषय आहे.

श्रीमद् भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायातील श्लोक क्र. ७ ते ११ मध्ये ज्ञानलक्षणे सांगितली आहेत. ११ व्या श्लोकाच्या उत्तरार्धात याहून उलटे ते अज्ञान असेही सांगितले आहे.

ज्ञानलक्षणे ही अठरा आहेत. ही ज्ञानलक्षणे सांगणाऱ्या सातव्या श्लोकातील पहिलेच जे ज्ञानलक्षण आहे ते म्हणजे 'अमानित्व'. या ज्ञानलक्षणाचा गूढार्थ उकलून दाखवितांना कैवल्याचा पुतळा, चैतन्याचा जिव्हाळा संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी ओवी क्र. १८५ ते २०१ अशा एकूण सतरा ओव्या प्रगट केल्या आहेत. त्यांचे जणू सार सांगणारीच ही पहिली ओवी आहे.

ज्ञान म्हणजे काय?

ज्ञान! ज्या ज्ञानाच्या तुलनेस दुसरी कोणतीही उपमा नाही, ते ज्ञान. ज्ञान हे कशासारखे? तर ज्ञानासारखेच! ज्या ज्ञानाच्या सत्तेने विश्वाचे व्यवहार चालतात, त्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी योगी लोक कशाचीही पर्वा करीत नाहीत. त्या ज्ञानाव्यतिरिक्त कशाचीही अपेक्षा करीत नाहीत. ऋद्धी-सिद्धींनादेखील दुर्लक्षित करतात. ऋषीमुनी ज्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी वेदात सांगितलेल्या मार्गाचे शोधन करतात, जे ज्ञान प्राप्त झाले असता अज्ञान नष्ट होते, ज्या ज्ञानाच्या प्राप्तीमुळे जिवात्मा-परमात्मा ऐक्य होते, जे ज्ञान गुंतागुंतीचा संसाररुपी वेल उपटून टाकते. संकल्परूपी चिखल धुवन टाकते. सर्वव्यापी परब्रह्माची भेट घडवून देते. 'मी जीव आहे', अशी जी जिवात्म्याची रोगग्रस्त अवस्था असते, ती ज्या ज्ञानाच्या प्राप्तीने दूर होते. आपण परमात्मास्वरूप आहोत, हे कळते, ते ज्ञान शब्दात सांगणे अशक्य असते. तरीही हे ज्ञान ज्यावेळी शरीरात उत्पन्न होते, त्यावेळी इंद्रियांच्या आचरणावरून दृष्टोत्पत्तीस येते. हृदयात ज्ञानप्राप्ती झाल्यावर त्याच्या शरीराच्या हालचाली, मानसिक व्यवहार, बोलणे, चालणे यामधील जनसामान्यांपेक्षा वेगळाच फरक, आचार-विचार यात झालेला बदल इ. बाबीं ज्या दिसून येतात. तीच ज्ञानलक्षणे होय.

'अमानित्व' या पहिल्याच ज्ञानलक्षणाचा गूढार्थ उघड करीत असताना पहिल्याच मध्यवर्ती ओवीत माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे,



**तरी कवणेही विषयींचे। साम्य होणे न रुचे।**
**संभावितपणाचे। वोझे जया।।१८५।।**

ज्या महात्म्यास ज्ञानाची प्राप्ती झाली आहे त्यास कोणत्याही विषयाचा अभिमान स्विकारून त्याबरोबर समरस होऊन जाणे रुचत नाही. त्याच्या सभ्यपणाचे किंवा महानतेचे वर्णन कोणी केल्यास त्यास ते ओझे वाटते.

प्रकृतीनिर्मित असंख्य विषयोपभोग जिवात्म्यास आपल्याकडे आकर्षित करीत असतात. यात सुख आगळेच आहे, त्याची चव न्यारीच आहे आदि प्रकारे विषय जिवास मोह पाडीत असतात. जिवाचे मूळ स्वरूप हे आनंदमयच असल्यामुळे तो नेहमी आनंदाच्या शोधातच असतो. ते त्याचे स्वस्वरूप हरवून अज्ञानाच्या घोरांधाराने वेढून गेलेला असल्याने स्वस्वरूपाऐवजी विरूपात सुख शोधीत असतो. ज्या विषयोपभोगात शाश्वत सुख नाही, त्यातच खरे सुख समजून त्याकडे तो धाव घेतो. मायानिर्मित विषयांच्या मागे तो धावत राहतो. परंतु अशा विषयोपभोगातून जिथे तिथे जवापाडे सुखाची आणि पर्वताएवढ्या दु:खाची प्राप्ती होत असल्याचे त्याच्या अनुभूतीस येते. मग एखाद्या, जन्मजन्मांतरीच्या पुण्यवंतास प्रश्न पडतो की, ज्या सुखास कधीही भंग नाही असे अभंग सुख कोणते? ते कसे मिळेल? त्यास भक्तीचा मार्ग मिळतो. त्या उत्कट भक्तीच्या फलस्वरूप त्यास सद्‌गुरूंची प्राप्ती होते. त्यांच्या उपदेशाने होते ज्ञानप्राप्ती, सच्चिदानंदस्वरूपाची प्रचिती! 'ज्ञानप्राप्ती जाळी विषयांची व्याप्ती!' भौतिक विषयांपासून होणारे सुख मग त्यास ओकून टाकलेल्या अन्नासारखे किळसवाणे वाटते, क्षुद्र वाटते.

सर्वोच्च आनंदाची प्राप्ती झालेला महात्मा पुन्हा कधीही नीच सुखाकडे वळत नसतो. विषयरूपाने तीच सुखे त्याच्याकडे पुन्हा येऊ नयेत, अशी त्याची मनोमन इच्छा असते. त्याची दोन महत्त्वाची कारणे अशी आहेत. पहिले म्हणजे भौतिक सुखे चिखलासारखी असतात, त्यात परमहंस रूतू इच्छित नाहीत. दुर्दैवाने पुन्हा असे झाले तर

लक्षावधी जन्म पुन्हा दु:खाच्या खाईतच लोटले जाण्याची त्यांना खात्री असते. दुसरे कारण म्हणजे, जे आताच सांगितले, ते सर्वोच्च आनंदस्वरूप त्यांना प्राप्त झालेले असते. त्या अमृतापुढे, मृतत्वस्वरूप असलेले हे विषय, हे विषासमान असल्याचे ते बरोबर जाणतात. विष आणि विषय हे शब्दसुद्धा किती साम्य दर्शवतात. म्हणून ज्ञानप्राप्त महात्मा कोणत्याही विषयाशी साम्य होऊ न देण्याविषयी दक्ष असतो. 'मानसन्मान'! तो होणे हाही एक भौतिक सुखाचाच प्रकार आहे. कारण तो देहासी संबंधित आहे.

जो पुरुष ज्ञानी असतो त्यास लोक खूपच मानतात. सामान्य लोकांमध्ये ज्या ज्ञानाचा अभाव असतो, ते ज्ञान ज्ञान्यामध्ये पुरेपूर असते. त्यामुळे ज्ञान्यास लोक सन्मान देत असतात. पण ज्ञानी मात्र अशा सन्मानाबाबत उदासीन असतो. एकतर तो मानसन्मान देहाचा असतो. सच्चिदानंदासमोर तो काहीच नसतो. देह हा फारच मर्यादित असतो. त्याचे सामर्थ्य फारच तोकडे, असे म्हणण्यापेक्षा नगण्य असते. परब्रह्माच्या शक्तीस्रोतावर जिवंत या संज्ञेस तो पात्र असतो. जिवात्म्याचे राहण्याचे जे ठिकाण तो देह एक संघात असतो. त्रिगुणांच्या सपाट्यात सापडून जीव हा भ्रामक सुखाच्या मागे लागलेला असतो. देहाचा मानसन्मान त्यामुळे जिवाचे सुखावणे हाही भ्रामकपणाचाच भाग असतो. प्रकृती परमात्म्याच्या सत्तेखाली सर्व काही करीत असते. जिवास भ्रामक सुखाच्या मागे लावीत असते.

परंतु ज्ञानी माणसास हे सर्व कळत असते. सन्माननीय फक्त परमात्मा असतो. त्याच्याच सत्तेने देहास जिवंतपण येत असते. ज्ञानी परमात्म्याशी एकरूप झालेला असतो. तो फक्त सच्चिदानंदात निमग्न असतो. त्याहून कोणताही आनंद मोठा नसतो. म्हणून तो मानसन्मानास महत्त्व देत नाही. प्रतिष्ठितपणाचे ओझे बाळगीत नाही. दुसरे असे की भिडेखातर जर त्याने तो मानसन्मान स्विकारला, स्विकारीतच गेला तर पुन्हा तो शबल सत्वगुणाच्या कचाट्यात येण्याची शक्यता असते. कारण



हा गुण सुखसंबंधाने आणि ज्ञानसंबंधाने जिवात्म्यास या देहात बांधून टाकत असतो. सर्वोच्च आत्मसुखापासून पुन्हा वंचित होण्याची ही शक्यता असते. म्हणून ज्ञानी प्रतिष्ठितपणास ओझे मानीत असतो. शिवाय गुणकर्मे ही प्रकृतीची असतात. परमात्म्याचा अंश जो जिवात्मा, त्याच्या सत्तेने ती घडत असतात. आत्मा हा साक्षीभूत असतो. ज्ञानी माणूस हे बरोबर जाणत असतो. प्रकृतीने केलेल्या कार्याचे कर्तेपण स्वत:कडे घेण्याची ज्ञान्याची इच्छा नसते, अंगची योग्यता ही प्रकृतीचीच असते. म्हणून 'ते माझे कर्तृत्व' असे न म्हणण्याबाबत ज्ञानी दक्ष असतो. अमानित्वाचा मुद्दा स्पष्ट करताना माऊली पुढे म्हणतात,

**आथिलेचि गुण वानिता। मान्यपणे मानिता।**
**योग्यतेचे येता। रूप अंगा।।१८६।।**

**तै गजबजो लागे कैसा। व्याधे रूंधला मृगु जैसा।**
**का बाही तरता वळसा। दाटला जेवी।।१८७।।**

**पार्था तेणे पाडे। सन्माने जो साकडे।**
**गरिमेते आंगाकडे। येवोचि नेदी।।१८८।।**

ज्ञानी माणूस हा ज्ञानसंपन्न असल्याने अलौकिक गुणांनीही समर्थ असतो. त्याच्या गुणांचे जर कोणी वर्णन केले तर ते त्यास एखाद्या संकटासारखे वाटते. त्या ज्ञानी माणसाचा कोणी सन्मान केला, त्याच्या अंगच्या योग्यतेची कोणी स्तुती केली तर तो घाबरा होतो.

ज्ञानी कसा घाबरा होतो, हे वर्णिताना येथे ज्ञानेश्वर माऊलींनी दोन दाखले दिले आहेत. यापैकी पहिला दाखला हा शिकाऱ्याने आडवलेल्या हरिणीचा आहे. तर दुसरा दाखला हा एखादा नदीतून पाण्यावर हात मारीत पोहून पलिकडे जात असताना भोवऱ्यात सापडलेल्या माणसाचा आहे.

परमेश्वरी ज्ञानाच्या आड जर काही येत असेल तर ती ऐहिक

सुखाची लालसा, भौतिक सुखांच्या आकर्षणाचे सामर्थ्य इतके जबरदस्त असते की कडक वैराग्याचासुद्धा ते एखादेवेळी धुव्वा उडवू शकते. ज्ञानी माणूस हा ज्ञानसंबंधाने कधी सत्वगुणात पुन्हा बांधला जाईल, याची शाश्वती नसते.

या कारणास्तव अंगचे गुण कोणी वर्णन केल्यास किंवा महान योग्यतेचे कोणी गुणगायन केल्यास सत्वगुणरूपी पारध्याने, आपणासारख्या ज्ञानरूपी हरिणास अडवल्यासारखे वाटते. प्रतिष्ठितपणाच्या लालसेने जर आपण सुखावून गेलो तर, आणि आपण महान, ज्ञानी, श्रेष्ठ अशा भौतिक महानतेच्या भावनांच्या जाळ्यात अडकलो तर, तो दिव्य आत्मानंद तो नित्य अनुभवित असतो त्यास, सत्वगुणरूपी पारध्याने अडकविल्याने, तो ज्ञानी मुकू शकतो. त्या दिव्य आत्मसुखास आपण पारखे होऊ शकतो, याची त्यास जाणीव असते. लाखो जन्मांच्या सत्कृत्यामुळे या जन्मी त्यास भक्तीची प्राप्ती होऊन सद्गुरूकृपा लाभलेली असते. त्यामुळेच परमेश्वरी ज्ञानाची देणगी मिळालेली असते म्हणून स्वरूपानंदात निमग्न असलेल्या ज्ञान्यास मानसन्मान आणि स्तुतीसुमनांची उधळण, या हत्यारांनी सत्वगुण हा पारधी पुन्हा त्याचा बळी घेण्यास टपल्याची जाणीव त्यास तात्काळ होते.

दुसरा तितकाच समर्पक दाखला माऊलींनी दिला आहे, तो म्हणजे पोहून जाताना भोवऱ्यात सापडलेल्या माणसाचा. भवनदीच्या अखंड प्रवाहाच्या अथांग पाण्यावरून दिव्य परमेश्वरी ज्ञानाच्या सामर्थ्याच्या बाहूबलाने ज्ञानी माणूस पोहून जात असतो. त्यास मानसन्मानाचे हाव रूपी भोवरे आपल्यात खेचून घेण्याचा प्रयत्न सतत करीत असतात. पाण्याच्या भोवऱ्यात सापडलेला माणूस त्यातच गरगरत राहतो आणि अल्पावधीतच तो प्राणास मुकतो. यास्तव सत्वगुणरूपी भोवऱ्यात सापडून आपण आत्मानंदास पारखे होऊ, म्हणून ज्ञानी माणूस कोणी त्याची स्तुती केली, थोरवी गायिली तर भोवऱ्यात सापडलेल्या पोहणाऱ्यासारखी त्याची अवस्था होते, असे सार्थपणे माऊलींनी म्हटले आहे.



अमानित्वाचे मानित्वात केव्हा रूपांतर होईल, हे काही सांगता येणार नाही. साधकांना सत्वगुण जिंकण्यास अतिशय कठीण जातो. कारण तो निर्मल आहे. प्रकाशक आहे. दिव्य ज्ञानाच्या अगदी निकटचा आहे. पण अखेरीस तो गुणच आहे. तोही जिंकून ज्ञानी गुणातीत अवस्थेस गेलेला असतो. देहाचा सन्मान होवो वा अपमान, याबाबत तो उदासीन असतो. परंतु एखाद्या गाफील क्षणी सन्मान ज्ञान्यास भुरळ पाडू शकतो. एकदा जर मानित्वाकडे तो ओढला गेला तर त्याची वाटचाल त्याच्याही नकळत मानसन्मानाकडे चालू होऊ शकते. देहाच्या सन्मानाची चटक लागू शकते. आत्मानंदाचा विसर पडू शकतो. म्हणजेच ज्ञान्याची उच्चतम स्थिती ढळून तो देहस्थितीवरच येतो आणि त्यातच देह पडला तर सन्मान भोगण्यासाठी त्यास पुन्हा देहाची प्राप्ती होते, म्हणजेच जन्मास यावे लागते. त्याबरोबरच देहाच्या साऱ्या व्यथा-वेदना पुन्हा आल्या. मानाबरोबरच अपमानाचे विष पचवणेही साहजिकच आले. एवढा घात मोठेपणा घेतल्याने होऊ शकतो. सद्गतीकडे चाललेला ज्ञानी अधोगतीकडे कधी जाईल हे कळणारदेखील नाही. यास्तव ज्ञानी मोठेपणा आपणाकडे येऊ देत नाही. शिवाय मानसन्मान हा देहास दिला जातो. तो देह मायानिर्मित असतो. देहास प्राप्त होणारे मानसन्मान हे गुणांना प्राप्त होणारे असतात. त्यातून मिळणारा आनंद नाशवंत असतो. आत्मसुखापासून मिळणारा आनंद हा चिरंतन-अमर्याद-अवर्णनीय आणि अनुपम असतो. याउलट स्थिती देहाच्या मानसन्मानापासून मिळणाऱ्या आनंदाची असते. तो क्षुद्र असतो, बंधनकारक असतो. स्वस्वरुपापासून परावृत्त करणारा असतो. म्हणून ज्ञानी त्यापासून दूर राहतो आणि परमेश्वरी सत्तेवर देहाचे गुण पुष्ट होत असतात, त्यात देहाचा मोठेपणा काहीच नसतो. म्हणजेच त्यात आपले कर्तृत्व काहीच नसते. म्हणून सत्कृत्यांचा मोठेपणा हा आपला नसल्याचे ज्ञान्यास ठाऊक असते व जे कार्यकर्तृत्व आपले नाही, त्याचा मोठेपणा स्विकारणे हे ज्ञानी

लाजिरवाणे मानतो, असेही दुसरे एक कारण मानसन्मान आपल्याकडे येऊ न देण्यास असते.

तसेही जनतेने आपणास मानावे, आपणास नमस्कार करावा, आपला जयजयकार करावा अशी कोणाही संताची मनापासून इच्छा नसते. अमानित्वाचे संत उस्मान हैरी यांचे एक उदाहरण खूप बोलके आहे. एकदा ते गल्लीतून चालले होते. एका घराच्या वरच्या मजल्यावरून कोणीतरी खाली न पाहता थाळीभर राख टाकली. ती राख नेमकी खालून चाललेल्या संत उस्मान हैरी यांच्या डोक्यावर पडली. तेथून ती अंगभर झाली. डोक्यावरील व अंगावरील ती राख झटकून टाकीत संत उस्मान हैरी आकाशाकडे पाहत म्हणाले, ''हे परमेश्वरा, तू दयामय आहेस. तुला लाख लाख धन्यवाद!'' हा सारा प्रकार पाहत एक व्यक्ती जवळच उभी होती. त्या व्यक्तीने संतांना विचारले की, ''यात देवाला धन्यवाद देण्यासारखे काय आहे?'' त्यावर संत उस्मान हैरी स्मित करीत म्हणाले, ''हे बंधू, तसा मी आगीत जळण्याच्याच लायकीचा आहे. परंतु दयाळू परमेश्वराने राखेवरच भागविले!'' स्वत:बद्दल इतके अमानित्व संतांजवळ असते. आजच्या समाजजीवनात बहुतांश ठिकाणी आपण पाहतो, एखाद्याचा दुसऱ्या एखाद्यास चुकून धक्का लागला तर क्षणाचीही उसंत न घेता लगेचच, ''डोळे फुटलेत का? आंधळा आहेस का? टाकली आहेस काय? फार मस्ती आली का? कुठं बघून चालतोस?'' अशी झाडणी चालू होते. माफीससुद्धा तोंड उघडू दिले जात नाही.

तर भक्तहो, ज्ञानी हा सर्व मान-अपमानाच्या पलिकडे गेलेला असतो. वास्तविक पाहता मानवी समाजात मान मिळवण्याकडे प्रवृत्ती असते. प्रतिष्ठा-सन्मान-कीर्ति याकडे ओढा असतो. हे मिळवण्यासाठी चढाओढ लागलेली असते. नव्हे, झुंबड उडालेली असते. कोणी पैशाच्या जोरावर मान हासिल करण्याचा प्रयत्न करतो तर कोणी पुढारीपणा स्विकारतो. कोणी प्रवृतीशास्त्रातील ज्ञानाच्या जोरावर दिगंत कीर्ति



मिळवण्याची अपेक्षा ठेवतो तर कोणी अध्यात्मज्ञानाचा त्यासाठी वापर-जो करायचा नसतो तोसुद्धा करतो. कोणी भक्तीच्या दिखावूपणाने स्वत:च पूजनीय बनण्याचा प्रयत्न करतो. परंतु ज्ञानी माणूस या साऱ्यास पराङ:मुख असतो. माऊली म्हणतात,

**पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ति कानी नायकावी।**
**हा आमुका ऐसी नोहावी। सेचि लोका।।१८९।।**

**तेथे सत्काराचि के गोठी। के आदरा देईल भेटी।**
**मरणेसी साटी। नमस्कारिता।।१९०।।**

आपणास कोणी पूजनीय मानलेले आपल्या डोळ्यांनी न पाहावे. स्वत:च्या कानांनी स्वत:ची स्तुती ऐकू नये. हा अमूक एक आहे, अशी लोकांना आठवणही होऊ नये, अशी ज्या ज्ञान्याची अतिउच्च मानसिक स्थिती असते तेथे त्याच्या सत्काराची गोष्ट ती काय? किंवा कोणी त्यास आदर दर्शविला तर तो ज्ञानी कसा स्विकारील? त्यास कोणी नमस्कार केला तर तो त्यांना मरणप्राय वाटतो. सारे जग ज्या गोष्टींसाठी अखंड धडपड करीत असते, नेमक्या त्याच गोष्टी आपणास मिळू नयेत असे ज्ञान्यास का वाटावे? एकतर तो त्यापार गेलेला असतो. दुसरे असे की 'पूजनीयते' सारख्या सर्वोच्च बाबींच्या मोहापासून त्यास दूर राह्यचे असते. महात्म्यांच्या महान मनाला, महाकीर्तिचा मोह पडण्याची शक्यता असते. दुसऱ्या कशानेही ज्ञानी लिप्त झाला नाही तरी सोज्वळ निर्मळ अशा किर्तीत लिप्त होण्याची शक्यता असते. प्रख्यात इंग्लिश कवी जॉन मिल्टन यांनी एका कवितेत म्हटले आहे.

**Fame is the spur, that the clear spirit doth raise**
**(That last infirmity of noble mind)**

**Fame is stimulant which inspires the pure soul.**

**(Fame that greatest weakness of noble mind.)**

(कीर्ती ही शुद्धात्म्याला प्रेरित करीत असते की जी त्या शुद्धात्म्याच्या महान मनाची कमकुवतता असते.) जॉन मिल्टनने हे काव्योद्‌गार काव्यनिर्मितीच्या संदर्भातील आहेत पण ते येथे पूर्णपणे लागू पडतात म्हणून उद्‌धृत केले आहेत.

हा ज्ञानी, हा महात्मा, हा सिद्धपुरुष, हे पूजनीय व्यक्तीमत्व, हे योगी अशी बिरुदावली ज्ञानी सहन करू शकत नाही. तो सर्व उपाधींच्या पलिकडे गेलेला असतो. ह्या सर्वसन्माननीय बाबी त्यास दिव्य, परमानंदापासून ओढून घेणाऱ्या आहेत, हे त्यास पक्के ठाऊक असते. म्हणून महर्षि किंवा आचार्य वगैरे उपाध्या लावून घेऊन पूजनीय बनणे ही बाब ज्ञान्यास आवडत नाही.

स्वामी राम म्हणून अमेरिकेत प्रसिद्ध पावलेले एक तपस्वी ज्ञानी यांनी एकेकाळी करवीरपीठाचे शंकराचार्य म्हणून पिठाधिपतीचे पद स्वीकारले होते. तो किस्सा अमानित्वाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने येथे सांगत आहे.

नर्मदा नदीच्या काठावर तो तपस्वी राहत होता. नदीतील मगरी पाण्यातून वर येऊन त्याच्याजवळ वाळूत उन्हाला पहुडल्या असल्याचे एक छायाचित्र बऱ्याच वर्षांपूर्वी एका इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. ते लोकमान्य टिळकांच्या संग्रही होते. करवीर पिठाचे शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी व टिळकांचा स्नेह होता. करवीर पिठावर उत्तराधिकारी नेमायचा होता. लायक व्यक्तीचा शोध सुरू होता. टिळकांच्याकडे चौकशी झाल्यावर त्यांनी त्या तपस्व्याचा फोटो पाठवून दिला. त्यानुसार करवीरचे काही जाणकार ओंकारेश्वरजवळ गेले. तपस्व्याला कसलीही कल्पना न देता त्यांनी त्याचे आठवडाभर निरीक्षण केले. त्यांची सर्व माहिती जमविली. ही व्यक्ती योग्य असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी निर्णय घेतला. एके दिवशी तपस्व्याची भेट घेऊन त्यांना शंकराचार्यपद स्वीकारण्याची विनंती केली. त्यावेळी त्या तपस्वीने त्यांना सांगितले की,



हिमालयातील त्यांच्या गुरूची अनुमती घेतल्याशिवाय ते पद त्यांना स्वीकारता येणार नाही, असे सांगून ते हिमालयातील अज्ञात स्थळी गुरूकडे निघून गेले.

त्या तपस्वींनी सारा वृत्तांत गुरूंना सांगितला त्यावर गुरूंनी विचारले, ''तुझ्या मनात आहे का?'' त्यावर तपस्वी 'हो' म्हणाले. गुरूंनी परवानगी दिली. तपस्वी परतले. पुढे ते करवीर पिठाचे शंकराचार्य झाले. काही दिवस निघून गेले.

सकाळी उठायचे. पूजापाठ आटोपायचा. भरजरी वस्त्रे परिधान करायची. भक्तांचे हार, फुले स्वीकारीत राह्यचे. भक्तांना आशीर्वाद द्यायचे. पाद्यपूजा स्वीकारायची, हे सारे बरेच दिवस चालले.

पण तपस्व्याचे मन गुदमरू लागले. मान-सन्मान-पूजा-इतर सोपस्कार यांचे ओझे वाटू लागले. उपाधीच्या ओझ्याखाली ते दबू लागले. त्यांना नर्मदेचा शांत काठ दिसू लागला. हिमालयाची ओढ वाटू लागली. एक दिवस त्यांनी कोणालाही कसलीही कल्पना न देता करवीर पीठाच्या शंकराचार्याचा पदभार सोडला. मजल-दरमजल करीत त्यांनी हिमालयातील आपल्या गुरूंचे ते अज्ञातस्थळ गाठले.

गुरूसमोर उभे राहताच गुरू जोरजोरात हसले आणि म्हणाले, ''बेटा, तुला हौस होती ना पीठाधीश बनण्याची समाजात मानसन्मान लाभण्याची! ही क्षुद्र वासनाच. ती या जन्मी पुरी झाली. आता तुला अशा क्षुद्र इच्छा मोहीत करणार नाहीत. आता तू खऱ्या तपस्येसाठी हिमालयात जा.''

गुरूंच्या आज्ञेनुसार ते एकांत तपश्चर्येसाठी हिमालयातीलच अज्ञात स्थळी गेले. पुढे गुरू आज्ञनेनुसार अमेरिकेत गेले. स्वामी राम म्हणून प्रसिद्धी पावले.

ही गोष्टी येथे दोन बाबी सिद्ध करते. पहिली म्हणजे महान तपस्वी मनाला, ज्ञान्यालासुद्धा, मोठ्या मानसन्मानाचा कीर्तीचा मोह पडू शकतो. दुसरी गोष्ट म्हणजे अशा मोहात फसलेला ज्ञानी त्यात रमू शकत नाही. तो

परत आपल्या मूळ भूमिकेवर येतो. या सत्य घटनेत खरा ज्ञानी कीर्ति मोहात गुरफटू शकतो, पण रमू शकत नाही, हे दिसून येते. ज्ञानी अशा मोहात गुरफटण्याचे कारण म्हणजे या बाबी सात्विक-सोज्वळ-निर्मळ-भक्ती-ज्ञान-संदर्भातील असतात. त्यासाठी ज्ञानी अशा बाबींपासून स्वत:स दूर ठेवतात. स्वामी राम यांना पूजनीयता, उपाधि, कीर्ति मानवली नाही. त्यांनी त्याचा त्यागही केला. अमानित्वाचे हे उदाहरण मागील म्हणजे विसाव्या शतकातील आहे.

ज्याला कोणत्या ना कोणत्या कारणाने एखादा माणूस मानतो त्यासच तो नमस्कार करतो. हा मानीपणाचा नमस्कार देखील स्वीकारणे ज्ञान्यास अवघड वाटते. कारण त्यात मानीपणा असतो म्हणून कोणी नमस्कार केल्यास त्यास ते मरणप्राय वाटते.

ज्ञानी माणसाच्या ठायी परमेश्वरी ज्ञानाच्या प्रसादाने बृहस्पतीसारखी सर्वज्ञता असते. मात्र आपला महिमा वाढेल या भितीने तो ती लोकात प्रगट करीत नाही. माऊली म्हणतात,

**वाचस्पतीचे नि पाडे। सर्वज्ञता तरी जोडे।**
**परि वेडिवेमाजि दडे। महिमे भेणे।।१९१।।**

**चातुर्य लपवी। महत्त्व हारवी।।**
**पिसेपण मिरवी। आवडोनि।।१९२।।**

**लौकिकाचा उद्वेगु। शास्त्रांवरी उबगु।**
**उगेपणी चांगु। आथी भरू।।१९३।।**

बृहस्पतीसारखी सर्वज्ञता अंगी असूनही ज्ञानी हा आपला महिमा वाढेल या भीतीने वेड पांघरून दडून बसतो. तो आपला चतुरपणा लपवून आपले महत्त्व सोडून देतो आणि आवडीने वेडेपण मिरवितो. त्यास प्रसिद्धीचा उद्वेग असतो. प्रवृत्तीशास्त्रांवरील वादविवादाबद्दल ज्ञान्यास नावड असते. शांतपणे - स्वस्थ्य राहणेच ज्ञान्यास फार आवडते.



एक ज्ञानी कृष्णभक्त होते. ते राधाष्टमीचा उत्सव साजरा करीत. एकदा उत्सव चालू असताना एक शास्त्रीबुवा त्यांच्याकडे आले. 'मला तुमच्याशी वादविवाद करायचा आहे' असे त्या ज्ञानी भक्तास म्हणाले. त्यावर ते ज्ञानी म्हणाले, ''आता माझी पूजा चालू आहे. ती झाल्यावर मी तुमच्याशी वादविवाद करेन!'' पूजा होताच भजन सुरू झाले. त्यात ते ज्ञानी भक्त तल्लीन होऊन नाचू लागले. आत्मानंदात मग्न झाले. नाचता नाचता त्यांनी शास्त्रीबुवास स्पर्श केला. शास्त्रीबुवाही उठून नाचू लागले. थोड्या वेळाने भजन संपले. त्या ज्ञानी साधूने वादविवादासाठी शास्त्रीबुवांना पाचारण केले. शास्त्रीबुवा त्या ज्ञानी साधूच्या चरणावर पडले म्हणाले, ''शास्त्रार्थाची किंमत मी ओळखली. मी आपणास शरण आलो आहे.''

ज्ञानी भक्ताच्या स्पर्शाने त्या शास्त्रीबुवास परतत्वाचा स्पर्श झाला होता. त्याचा शास्त्रांच्या ज्ञानाभिमानाचा गर्व गळून पडला होता. आत्मानंदात निमग्न असणारे ज्ञानी सर्वज्ञ असूनही शास्त्रार्थाच्या वादविवादात कधी पडत नाहीत. शब्दबंबाळ वक्तृत्त्वाने पुढच्यास चकित करून स्वत:कडे पूज्यता घेण्याची त्याची बिलकूल इच्छा नसते.

ज्ञानी-सिद्धपुरुष सर्वज्ञ असले तरी त्याचा डांगोरा ते पिटीत नाहीत. उलट वेडेपणा पांघरून ते सहज जीवन जगत असतात. सर्वशक्तीप्राप्त संतमहात्मेसुद्धा असेच राहत असतात.

शेगावीचे संतश्रेष्ठ गजानन महाराज यांच्या अवतार कार्यातील दोन किस्से येथे ओघानेच आले म्हणून सांगतो.

पहिला किस्सा आहे तैलंगी ब्राह्मणांच्या संदर्भातील. शेगावच्या खंडू पाटलांनी गजानन महाराजांना आपल्या घरी राह्यला नेले होते. तेथे दहापाच म्हणजे पंधरा तैलंगी ब्राह्मण आले. ते वेदज्ञ होते. तरीपण आपणास थोडेतरी धन येथे मिळेल या आशेने ते तेथे आले होते. त्यावेळी गजानन महाराज झोपले होते. त्यांना उठवण्यासाठी उच्च स्वरात

वेदज्ञ ब्राह्मणांनी मंत्राक्षरी उच्चारली. उच्चारात त्यांची चूक झाली. ती त्यांनी दुरूस्त केली नाही. म्हणून महाराज उठून बसले. ते ब्राह्मणांना म्हणाले, ''तुम्ही कशाला वेदज्ञ ब्राह्मण झालात? ह्या मोक्षदायी पवित्र विद्येला कमीपणा आणू नका. ही पोटाची विद्या नसून मोक्षाची विद्या आहे. भोळ्या भाविकांना उगाच फसवू नका.'' अशी खरडपट्टी काढून, ब्राह्मणांनी जे मंत्रोच्चार सुरू केले होते, तो संपूर्ण अध्यायच त्यांनी खडाखडा म्हणून दाखवला. जणू काय व्यास किंवा वसिष्ठच उच्चारत आहेत असे वाटावे, इतके स्पष्ट उच्चार होते. कुठेही कसलीही चूक नव्हती. वेदज्ञ ब्राह्मण चकीत झाले. खाली माना घालून बसले. ते म्हणाले, ''हा वेडा कुठला, महाज्ञानी आहे! आमचे परमभाग्य म्हणून आम्हास याचे दर्शन घडले. चारी वेद याच्या मुखात प्रत्यक्ष नांदतात.'' मग महाराजांनी रुपया रुपया दक्षिणा खंडू पाटलांकडून देवविली. नंतर ते दुसऱ्या गावी निघून गेले.

श्री गजानन महाराजांचा दुसरा किस्सा आहे. पोटार्थी गोसाव्यांच्या फजितीचा. शेगावात उपाधि वाढू लागली म्हणून ते कृष्णाजी पाटलांच्या मळ्यानजिकच्या मंदिरापाशीच्या पत्र्याच्या शेडमध्ये राह्यला आले.

एक दिवस शेगावात दहावीस गोसावी आले. त्यांनी स्वत:ची बरीच महती कृष्णाजी पाटलांना सांगितली, ''आम्ही सारा वेदांत जाणतो, तो ऐकण्यास आपण मळ्यात यावे. आम्हास शिरा-पुरीचे जेवण द्यावे.'' असे सांगून ते गोसावी गजानन महाराजांची निंदा करू लागले. ''तुम्ही वेड्याला मळ्यात ठेवून फुकट पोसला आहे. तुम्ही गाढवांना पोसता आणि गायींना लाथाडता!' त्यावर कृष्णाजी पाटील काही न बोलता त्यांना मळ्यात घेऊन आले.

सायंकाळी ब्रह्मगिरी महंत श्रीमद् भगवद्गीतेवर प्रवचन करण्यासाठी बसले. त्यांचे शिष्य इतर गोसावी ते ऐकण्यासाठी बसले. इतरही गावकरी श्रोते जमले. श्री गजानन महाराजही पलंगावर उठून बसून ते ऐकू लागले.



त्यांना भास्कर चिलीम भरून देत तेथेच बसून राहिला होता. ब्रह्मगिरी गोसाव्याने श्रीमद भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील पुढील तेविसावा श्लोक निरूपणासाठी निवडला होता,

**नैनं छिन्दति शस्त्राणि नैनं दहति पावक:।**
**न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारूत:।।२३।।**

**– अ. दुसरा**

ह्या आत्म्याला शस्त्र ही तोडू शकत नाही. अग्नी जाळू शकत नाही. पाणी भिजवू शकत नाही आणि वारा सुकवू शकत नाही.

बराच शब्दच्छल करीत या श्लोकावर ब्रह्मगिरी या दांभिकाने व्याख्यान दिले. लोकांना ते पटले नाही. दरम्यान श्री गजानन महाराजांच्या चिलिमीतील विस्तवाची एक ठिणगी पडून प्रथम पलंगावरचे वस्त्र पेटले. लगेचच चोहोबाजूंनी पलंगाने पेट घेतला. महाराज पलंगावर निवांत बसून होते. लोक ओरडू लागले ''महाराज पलंग पेटला उठा. खाली बाजूला या.'' पण महाराज जराही हलले नाहीत. उलट पलंगाची आग विझवण्यास त्यांनी मज्जाव केला.

ब्रह्मगिरी गोसाव्यास श्री गजानन महाराज म्हणाले, ''अहो, ब्रह्मगिरी महाराज, आत्ताच तुम्ही, 'नैनं छिंदंती शस्त्रानी, नैनं दहती पावक...' श्लोकावर व्याख्यान दिले. इकडे या! या जळत्या पलंगावर बसून आता तुम्ही सिद्ध करा की या आत्म्याला अग्नी जाळू शकत नाही!''

चोहोबाजूने पेटलेला पलंग, त्यावर निवांत बसलेले संत. ब्रह्मगिरीची बोबडी वळली. त्या पलंगाकडे पाऊल टाकण्याचे त्याचे धाडस होईना. महाराजांनी भास्करास आज्ञा केली, ''त्यास माझ्याजवळ बसायला घेऊन ये!'' आज्ञा प्राप्त होताच बलदंड भास्कराने ब्रह्मगिरी गोसाव्यास पकडले आणि फरफटतच जळत्या पलंगाकडे आणले. तो गयावया करू लागला. ''नैनं दहती पावक.' हे खरे करून दाखव.'' महाराज पुन्हा

म्हणाले. ते ऐकून भीत भीत ब्रह्मगिरी म्हणाला, ''महाराज, मी पोटभऱ्या संत आहे. शिरापुरी खाण्यासाठी मी गीताशास्त्र शिकण्याचा खटाटोप केला. तुम्हाला मी वेडा म्हणालो, गाढव म्हणालो. मला पश्चात्ताप होतोय. मला माफ करा.''

चोहोकडून अग्निज्वाला चालूच होत्या. मध्ये महाराज निवांत होते. ग्रामस्थांना धडकी भरली. त्यांनी महाराजांना म्हटले, ''महाराज, आम्हांस भीती वाटते. आपण खाली यावे.'' जनविनंतीस मान देऊन महाराज ज्वालातून बाहेर खाली आले. त्याबरोबर जळता पलंग मोडून खाली कोसळला.

ब्रह्मगिरी श्री गजानन महाराजांच्या चरणी लागला. मध्यरात्री त्यास महाराजांनी बोध केला. सकाळी कोणालाही भेटता तो शिष्यांसह निघून गेला. हे दोन्ही किस्से श्री दासगणू महाराज विरचित 'श्री गजानन विजय' ग्रंथाच्या आठव्या अध्यायात आहेत. ज्ञानीपुरुष-सिद्धपुरुष-अवतारी पुरुष पिसेपण मिरवीत असतात. सर्वज्ञ अवतारी पुरुषाचे अमानित्व आगळेच असते. ज्ञानी पुरुषांस आणखी काय वाटते ते पुढील ओव्यांत माऊली श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात,

**जगे अवज्ञाचि करावी। संबंधि सोयचि न धरावी।**
**ऐसी ऐसी जीवी। चाड बहु।।१९४।।**

**तळौटेपणे बाणे। आंगी हिणावो खेवणे।**
**ते तेचि करणे। बहुतकरूनी।।१९५।।**

**हा जितु ना नोहे। लोक कल्पी येणे भावे।**
**तैसे जिणे होआवे। ऐसी आशा।।१९६।।**

लोकांनी आपला अपमानच करावा. आप्तवर्गाने आपली चिंता करू नये. त्यांनी आपल्यासी संबंधच ठेवू नये, अशा प्रकारची आंतरिक



आवड ज्ञान्यांना असते. जगाने आज्ञाभंग केल्यावर, मान न दिल्यावर तो कोणत्याच पाशाने जगाशी बांधला जात नाही. आप्तवर्गाने आपल्याविषयी चिंता न केल्याने प्रेमरज्जू चिवट होण्याचा प्रश्नच येत नाही. यासाठी तो नातेवाईकांनी स्नेहबंध ठेवू नयेत, अशी इच्छा धरतो. ज्ञानी माणसाच्या अंगी नम्रता पूर्णपणे भरलेली असते. हीनपणा हाच आपला अलंकार आहे आणि तोच लोकांनी आपल्या अंगावर घालावा, असे वर्तन तो करतो. हे करण्यामध्ये लोकांनी त्याचेपासून दूर राहावे व मोठेपणा न द्यावा हा हेतू असतो. हा जिवंत आहे की मेला आहे, असा संभ्रम लोकांत निर्माण व्हावा आणि कोणत्याही परिस्थितीत लोकांनी आपणाकडे आकर्षित होऊ नये, असे अमानित्वाचे लक्षण प्रगट झालेल्या ज्ञानी पुरुषाचे वर्तन असते.

पंढरपुरास एक मठात, एके दिवशी, एक वारकरी आला. त्याने काळे कपडे घातले होते. मठाधिपतींनी त्यांना त्याचे कारण विचारले तेव्हा त्या वारकऱ्यांने उत्तर दिले की, ''कामक्रोधादिक मित्रांचा नुकताच मृत्यु झाला. त्याच्या शोकास्तव हे काळे कपडे घातले आहेत.''

मठाधिपतीने परीक्षा घ्यायचा निर्णय घेतला. नोकराकडून धक्के मारून त्या वारकऱ्यास हकलून दिले. पुन्हा थोड्या वेळाने त्यास त्याच नोकरामार्फत आदराने बोलावून आणले. पुन्हा धक्के मारून हाकलून काढले. पुन्हा असे सत्तर वेळा केले. पण त्या वारकऱ्याच्या वृत्तीमध्ये फरक पडला नाही. दरवेळी तो पांडूरंगाची इच्छा म्हणून शांत राही.

शेवटी महाधिपतींनी त्यास मिठी घातली. ते वारकऱ्याची स्तुती करू लागले. तेव्हा ते वारकरी हसून म्हणाले, ''पुरे करा. एखादे बिचारे कुत्रेही जास्त सहनशील असते. हजारदा हकलले तरी परत येते!''

आता दुसरे उदाहरण ऐका. एक निंदक, एका भक्ताची, त्याच्याबरोबर चालत त्याची निंदा करू लागला. ज्ञानी भक्तही शांतपणे

ती ऐकत चालत राहिला. रस्त्यात एका जागी अचानक थांबून तो त्या निंदकास म्हणाला, ''तुला माझा जेवढा अपमान करायचा आहे, तो येथेच करून घे. पुढे मला मानणारे लोक आहेत त्यांनी जर ऐकले तर ते तुला त्रास देतील.'' तो निंदक गपचूप निघून गेला.

आता तिसरे उदाहरण पाहा. मलिक नावाचा एक ज्ञानी तपस्वी एकदा रस्त्याने चालला असता एक बाईने त्यांना 'ए बदमाष' अशी हाक मारली. मलिक थबकले. हसून ते त्या बाईस म्हणाले, ''बाईसाहेब, इतक्या दिवसात मला माझ्या खऱ्या नावाने हाक मारणारी तूच भेटलीस. आनंद झाला. कारण भगवंताला विसरून जगत राहणं ही बदमाषीच होय.''

तर ज्ञानी पुरुषांमध्ये अमानित्व या ज्ञानलक्षणाचे दर्शन अशा प्रकारे घडते. हे आपण या तिन्ही ठिकाणी पाहिले. जर मानी या अज्ञानलक्षणाने युक्त असलेली व्यक्ती वरील तिन्ही उदाहरणाठायी असती तर काय घडले असते, याची कल्पनाच करा!

महाराज, अमानित्वाच्या ज्ञान लक्षणाची ही कोणास अतिशयोक्ती वाटेल, पण ते सत्य आहे. कितीतरी ज्ञानी सत्पुरुष अमानित्वाच्या खुणा दर्शवित असेच वागले आहेत. त्यांनी लोकोद्धारास्तव कार्य केले. (लोकांच्या नकळत देखील). पण ते कुठेही अलौकिकत्वाच्या आहारी गेले नाहीत. उपाधीस चिकटून या भीषण भवसागरात 'बुडाले' नाहीत.

अमानित्वाच्या ज्ञानलक्षणात जो पुरुष प्रकर्षाने स्थित आहे, त्याबाबत माऊली पुढे म्हणतात,

**पैं चालतु का नोहे। की वारेनि जातु आहे।**
**जना ऐसा भ्रमु जाये। तैसे होईजे॥१९७॥**

**माझे असतेपण लोपो। नामरूप हारपो।**
**मज झणे वासिपो। भूतजात॥१९८॥**



**ऐसी जयाची नवसिये। जो नित्य एकांता जातु जाये।**
**नामेचि जो जिये। विजनाचेनि॥१९९॥**

हा आपल्या पायांनी चालतो आहे की वाऱ्याने पुढे ढकलला जात आहे, असा भ्रम जनलोकांना व्हावा अशी त्याची इच्छा असते. माझे अस्तित्व लोपून जावे. नामरूप नाहीसे व्हावे. प्राणीमात्राला माझ्यापासून अजिबात भीती वाटू नये असे व्हावे. अशी त्याची नवसे असतात. तो नित्य एकांत सेवत असतो. एखाद्या निर्जन जागेचे नाव ऐकताच त्यास आनंद वाटत असतो.

ज्ञानी माणूस हा पूर्णपणे निगर्वी असतो. अमानित्वाचे ज्ञानलक्षण प्रगट झालेल्या माणसाचे चालणेही इतके सहज असते की त्याच्या चालण्यात देखील मानीत्वाची किंचितही झलक दिसत नाही. वाऱ्याने ढकलला जात आहे की काय? असे लोकांना वाटावे इतके अमानित्व देहपातळीवरसुद्धा प्रगट होत असते.

असणेपणाच्या मूळ जाणिवेतूनच तर विश्वाची निर्मिती झाली. त्या जाणिवेनेच ब्रह्मास जीवदशेस यावे लागले. ज्ञानी हे बरोबर जाणत असतो. आपले अस्तित्व आहे, असे जे आपण समजतो तेथेच भ्रमाचे मूळ आहे. दुःखाचा आरंभ आहे. सच्चिदानंदघन परमात्म्याव्यतिरिक्त अस्तित्व राखणे म्हणजेच भवदुःखांना थारा देणे होय. हीन आनंद आणि दारूण दुःखाचा स्विकार करणे आलेच. खरे म्हणजे आपले काहीच नसताना, भ्रमाने आपले म्हणतो, हे माझे नाव, हा माझा देह, घर वगैरे हा भ्रम असतो. ज्याक्षणी जिवात्मा देहातून बाहेर निघतो, त्याक्षणी त्याचे काहीच राहत नाही. राहते ती त्याच्या अस्तित्वाच्या वेळी चिकटलेली आसक्ती. नामरूपाच्या गौरवाची ओढ. त्याच्या पूर्ततेसाठी पुन्हा देहप्राप्ती.

अमानित्वाचे ज्ञानलक्षण प्रगट झालेला ज्ञानी हे सारे बरोबर जाणतो. म्हणून तो आपले अस्तित्व लोपून जावे, नामरूप हरपून जावे, मला

सगळ्यांनी विसरून जावे. माझ्यामुळे कोणास भीती वाटू नये, अशी नवसे करतो.

ज्ञानी हा अतिशय उच्च, किंबहुना सर्वोच्च अशा ज्ञानावस्थेत वावरत असल्याने आणि जनलोकात ती दुर्मिळ असल्याने त्याची धाव निर्जन जागेकडे असते. त्या ठिकाणी जगण्याने त्या आनंदघनस्वरूपात कसलाच व्यत्यय येत नाही.

ज्ञानी जनलोकांसाठी काही कल्याणकारी कार्य जरूर करील. पण लौकिकाची, संभावितपणाची हाव कधीही धरणार नाही. अस्तित्वाची चिंता करणार नाही, कीर्तिची अभिलाषा बाळगणार नाही. आपले जनकल्याणकार्य समाप्त झाले की तो एकतर विजनवासात राहील अथवा परमेश्वरांची आज्ञा प्राप्त झाली तर समाधीस्त होईल.

भक्तहो, आपण ज्यांच्या ओव्यांवर हे प्रवचन करीत आहोत, ते ज्ञानेश्वर माऊली हे स्वत:च सर्व ज्ञानलक्षणांचे म्हणजे अठराच्या अठरा ज्ञान लक्षणंचे अत्युत्कृष्ट उदाहरण आहेत. केवळ अमानित्वाच्या लक्षणाचे नव्हे. पण विषय या एकाच ज्ञान लक्षणाचा असल्याने त्यासंदर्भात बोलावे लागत आहे.

अखिल मानवजातीसाठी मोक्षाची पर्वणी प्राप्त करून देणारे ज्ञानेश्वर महाराज! ज्ञानियांचा राजा! योगेश्वर! कारणपरत्वे सहजता त्यांच्या कडून काही चमत्कार घडले. परमेश्वराचेच ते प्रतिरूप असल्याचे त्यावरून सिद्ध झाले. श्रीमद् ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या प्रगटीकरणाने त्यांना अद्वैत तत्त्ववेत्ता व अलौकिक प्रतिभेचा कवी म्हणून मान्यता मिळाली. अमृतानुभवाने श्री ज्ञानेश्वर माऊलींना सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानी ठरवले. अभंगगाथा, हरिपाठ, चांगदेव पासष्टी इत्यादी अनेक अलौकिक निर्मिती त्यांच्याकडून सहजता प्रगटली होती. श्रीहरी ज्ञानेश्वर महाराजांनी मनात आणले असते तर त्यांना वाटतील तितकी वर्षे ते धन-मान-सन्मान-कीर्ती यांचा लाभ ते घेऊ शकले असते. परंतु त्यांनी तसे केले नाही. कारण ते ज्ञानाचे ईश्वरच होते.



जगदोद्धाराचे जनकल्याणाचे अलौकिक कार्य करून वयाच्या अवघ्या बावीसाव्या वर्षी, योगियांनी संजिवनसमाधीमध्ये आपले अस्तित्व लोपविले. ज्या ज्ञानेश्वरीत माऊलींनी अठरा ज्ञानलक्षणे विस्तारपूर्वक स्पष्ट केली, जी सर्वच्या सर्व त्यांच्या ठायी होती आणि अमानित्वाच्या ज्ञानलक्षणाची वैशिष्ट्ये सांगताना,

**'माझे असतेपण लोपो। नामरूप हारपो।'**

अशी अप्रतिम ओवी प्रगट केली, त्या ओवीचे सार्थपण स्वत: ज्ञानियांच्या राजांनीच दाखवून दिले हे किती विशेष!

अशा प्रकारे ज्ञानीयांचे दिव्य जिवन असते. जनकल्याणाचे कार्य करून ते अशा प्रकारे समाधीस्त तरी होतात नाही तर निर्जन जागी वास्तव्यात धन्यता मानतात. लोकात राहिले तर लोक त्यांना मान देण्यास सुरुवात करतात. लौकिकात त्यांना काहीही रस नसतो. त्याला काय आवडते हे सांगताना माऊली या ओवीत म्हणतात,

**वायु आणि तया पडे। गगनेसी बोलो आवडे।**
**जीवे प्राणे झाडे। पढियंती जया।।२००।।**

जो वाऱ्याच्या अनुरोधाने वागतो. आकाशाशी बोलणे ज्यास आवडते आणि ज्याला झाडेच जीव की प्राणी आहेत असा अमानित्वाचे लक्षण प्रगट झालेला ज्ञानी असतो.

त्याची वाऱ्याशी मैत्री होते. झाडांशी सख्य होते. त्यामुळे कोणताही गुणदोष अंगाशी येत नाही. जनमानसात राहून होणाऱ्या वादविवादास, निर्जन जागी जराही थारा मिळत नाही. परमेश्वरविषयक बोलले तर ते आकाशाशीच! त्यामुळे प्रतिवाद होत नाही. आत्मानंदास गढूळ करील अशी कोणतीही गोष्ट वनातील निर्जन - एकांतवासात घडत नाही.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनीही आपल्या जगप्रसिद्ध अभंगात म्हटले आहेच -

**वृक्षवल्ली आम्हा। सोयरी वनचरे।**
**पक्षीही सुस्वरे। आळविती।।१।।**

**तेणे सुखे रूचे। एकांताचा वास।**
**नाही गुणदोष। अंगा येत।।२।।**

**आकाश मंडप। पृथिवी आसन।**
**रमे तेथे मन। क्रिडा करी।।३।।**

**कथा कमंडलू। देह उपचारा।**
**जाणवितो वारा। अवसरू।।४।।**

**हरिकथा भोजन। परवडी विस्तार।**
**करूनी प्रकार। सेवू रूचि।।५।।**

**तुका म्हणे होय। मनाशी संवाद।**
**आपुलाची वाद। आपणासी।।६।।**

या अभंगातही अमानित्व या ज्ञानलक्षणाचे चिन्ह विजनवासाची आवड-का-कशी-फायदे प्रगट झाले आहेत. खुद्द जगद्गुरू तुकाराम महाराज हेच अमानित्व व इतर ज्ञानलक्षणयुक्त होते, हे महाराज आपण जाणताच.

अशा प्रकारे अमानित्व या ज्ञानलक्षणाची वैशिष्ट्ये सांगून झाल्यावर माऊली ज्ञानेश्वर महाराज समारोपाचे बोलताना (अगदी ठामपणे), ज्ञानप्राप्ती झालेल्या व्यक्तीबद्दल सांगताना या ओवीत म्हणतात-

**किंबहुना ऐसी। चिन्हे जया देखसी।**
**जाण तया ज्ञानेशी। सेज झाली।।२०१।।**

अशी चिन्हे ज्याच्या अंगी पाहशील तो ज्ञानी झाला, असे समज असे माऊलींनी या समारोपपर ओवीत म्हटले आहे. म्हणून आपण ती चिन्हे सारांशरूपाने पुन्हा एकदा पाहू.



कोणत्याही विषयाची प्राप्ती आपणास व्हावी असे न वाटणे. प्रतिष्ठीतपणाचे ओझे वाटणे, अंगच्या गुणवर्णनाबद्दल नावड, सन्मानाने घाबरे होणे, मोठेपणा अंगाकडे येऊ नये देणे, कोणी पूजनीय मानले जाण्याचे नावडणे, स्वकीर्ति ऐकण्याचा तिटकारा, अमूक एका अशा उपाधिचा कंटाळा, नमस्कार करून घेताना मरणप्राय दु:ख होणे, सर्वज्ञता असूनही वेड्यासारखे वागून आपले महत्त्व वाढू न देणे, आपले मोठेपण सोडून वेडेपण मिरविणे, कीर्तिचा कंटाळा असणे, शास्त्रावरील वादविवादाचा उबग असणे, लोकांनी आपला अपमानच करावा, ही भावना, आप्तेष्टांनी आपली चिंता करू नये, असे वाटणे. म्हणजेच हा आपला कोणी आहे, असे त्यांना वाटू नये. नम्रपणा असणे, हीनपणा मिरविणे, आपण जिवंत आहे की नाही अशी शंका लोकांना वाटावी, वाऱ्याने ढकलल्यासारखे जात आहे, असे वाटावे इतके सौम्य चालणे आपले अस्तित्व, नामरूप सारे नष्ट व्हावे, असे तीव्रतम वाटणे (नवसे असणे) नित्य एकांतवासाची आवड. निर्जन जागेची आवड, वाऱ्याचा अनुरोध, आकाशाशी बोलणे, झाडे प्राणप्रिय वाटणे, अशी ही अमानित्वाच्या ज्ञान लक्षणाची वैशिष्ट्ये ज्ञानेश्वर महाराजांनी ओवी क्र. १८५ ते २०० पर्यंत जी सांगितली, त्याचा निर्देश करताना २०१ व्या ओवीत समारोपादाखल त्यांनी म्हटले की 'इही चिन्ही' म्हणून ती येथे परत एकदा सारांश रूपाने उल्लेखली.

आणि २०२ क्रमांकाच्या ओवीच्या पहिल्या व दुसऱ्या चरणात माऊली म्हणतात,

**पै अमानित्व पुरुषी। ते जाणावे इही मिषी।**

सन्मानाची इच्छा नसणाऱ्या ज्ञानी पुरुषाचे अमानित्वाचे लक्षण या चिन्हांनी ओळखावे.

'अमानित्व' या ज्ञानलक्षणावरील, श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या

ओव्यांवरील ह्या प्रवचनातील जे योग्य वाटले ते ज्ञानेश्वर माऊलींचे समजून ते हृदयी ठेवावे. अयोग्य वाटले ते ह्या अज्ञानी ह. भ. प. दिनकरचे समजून ते सोडून द्यावे व माफ करावे. जशी जमली तशी केलेली ही प्रवचन सेवा श्रीहरी ज्ञानेश्वर माऊली चरणी समर्पित.

पुंडलिका वरदे हरी विठ्ठल
श्री ज्ञानदेव तुकाराम श्री गुरुदेव दत्त।।
ॐ तत् सत्। ॐ तत् सत्। ॐ तत् सत्।

(इटकरे, ता. वाळवा, जि. सांगली, या आपल्या स्वग्रामी श्रीमद्‌गीता - ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सप्ताह व अखंड हरिनाम सोहळा, अंतर्गत श्री हनुमान मंदिरात (उत्तरेच्या) दि. १५ मार्च, २००१ रोजी दिलेले प्रवचन.)

